भारती विदयापीठ पोलीस ठाणे,पुणे.
दिनांक –२५/१०/२०१८

- प्रेसनोट –

कुख्यात आरोपी बाळा चौधरी यांनी व त्याच्या साथीदार यांने केलेल्या परशुराम उर्फ परश्या जाधव यांच्या खुनातील चार वर्षापासुन फरारी आरोपीच्या मुसक्या पोलीसांनी आवळल्या.

---

दिंनाक.०६/०८/२०१८ रोजी भारती विदयापीठ पोलीस स्टेशनच्या हददीत पोलीस सहा.पोलीस निरीक्षक श्रीशैल्य चिवडशेट्टी व तपास पथकातील कर्मचारी हे पेट्रोलिंग करित असताना तपास पथकातील पोलीस पोना.६४९८ सर्फराज देशमुख यांना त्याच्या गुप्त बातमीदारा मार्फतीने बातमी मिळाली की, २०१४ साली परशुराम जाधव यांच्या खुनातील फरारी आरोपी सागर वायकर हा कुंजीरवाडी, वायकरवस्ती जि.पुणे येथ्ील पाण्याच्या टाकीच्या जवळ त्याच्या घरी आला आहे. त्याने अंगात निळे रंगाचा, डिझाईन असलेला शर्ट घातलेला आहे. तेव्हा सदर बातमीप्रमाणे तपास पथकातील स्टाफच्या मदतीने कुंजीरवाडी, वायकरवस्ती, पाण्याच्या टाकीच्या जवळ पुणे येथे जावुन सागर सुभाष वायकर, वय ३१ वर्षे, रा. कुंजीरवाडी, वायकरवस्ती, पाण्याच्या टाकीच्या जवळ, ता हवेली, जि पुणे यास ताब्यात घेवुन त्याच्याकडे गुन्हयाच्या अनुषंगाने अधिक चौकशी करता त्याने परशुराम जाधव याचा त्याचा आरोपी मामा बाळु चौधरी यांने व त्याच्या इतर साथीदाराने खुन केल्यांनतर त्यांला पळुन जाण्यास स्कॉरपिओ देवुन मदत केली होती. सदर खुनाच्या बाबत भारती विदयापीठ पोलीस ठाणे पुणे गुरन.२६९/२०१४ भादवि कलम.१४३,१४५,१४७,१४८,३०२,३९५,५०६,१२०(ब) २०१ भारताचा हत्यार कायदा कलम. (३)२५, मुंबई पोलीस कायदा कलम.३७(१)सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल असुन त्यागुन्हयामध्ये सागर सुभाष वायकर, यास --अटक करण्यात आली आहे व त्याच्याकडे अधिक तपास करणेकामी मा. न्यायालयकडुन पोलीस कस्टडी रिंमाड घेऊन अधिक तपास करण्यात येत आहे.

सदर कामगिरी परिमंडळ २ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री बच्चनसिंग सो, सहाय्यक पोलीस आयुक्त रविंद्र रसाळ सो यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विष्णु पवार, पोलीस निरीक्षक(गुन्हे) विष्णु ताम्हाणे, तसेच तपास पथकाचे सहा. पोलीस निरिक्षक श्रीशैल्य चिवडशेटटी, पोलीस कर्मचारी चंद्रकांत फडतरे, कृष्णा बढे, सर्फराज देशमुख, सचिन पवार, कुंदन शिदे, गणेश चिचंकर, महेश मंडलीक, राहुल तांबे, अभिजीत रत्नपारखी यांनी केलेली आहे.